


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : २६७ वा गुरुवार दि. २६ डिसेंबर २०२४ पृष्ठ ८ किंमत ३रुपये

# एसीबीचे वरिष्ठ अधिकारी जिल्हा रुग्णालय भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करणार का?

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या महासंचालकाडे खरात यांनी पुराव्यांनिशी माहिती केली सादर

**कोव्हिडं १९ काळात मॉड्युलर ओटीसाठी आरोग्य शासनाने कोव्हीडचे व रुग्णाणचे गामभिर्य बघून त्वरित करोडो रुपये मंजुरात केले.परंतु जिल्हा सामान्य रुग्णालयातील संबंधित नालायक अधिकारी व कर्मचारासह कंत्राटदार यांनी त्या निधीत पूर्ण भ्रष्टचार केला असून ती मॉड्युलर ओटी आजही कार्यान्वीत नाही ती आज कार्यान्वित असती तर कोव्हिडं काळात कमीत कमी शेकडो रुग्णाणचे जीव वाचले असते या निर्लज बेशरम अधिकाऱ्यांवर मनुष्यवदाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी जिल्हाभरातून होत आहे**

जनसचंलन/बुलढाणा

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात बेबंदपणे आणि बेशरमपणे भ्रष्टाचार करून त्या भ्रष्टाचारातून बेनामी संपत्ती जमा करणाऱ्या अधिकाऱ्यांची तक्रार आणि पुरावे हे राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे विद्यमान महासंचालक यांच्याकडे लेखी स्वरूपात करण्यात आली आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजचा सातत्याने होत असलेला पाठपुरावा, तसेच सामाजिक कार्यकर्ते पुरस्कृत चंद्रकांत खरात यांच्या पुढाकारातून ही तक्रार करण्यात आली आहे. या तक्रारीत जिल्हा सामान्य रुग्णालय ज्यांनी भ्रष्टाचाराचे कुरण बनवले, त्यांच्यासंदर्भातील एक सविस्तर तक्रार करण्यात आली आहे. आता महत्वाचे हेच आहे की, या तक्रारीवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे महासंचालक नेमकी काय कारवाई करतात.जिल्हा रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचाराविषयी गेल्या दीड-दोन वर्षांपासून सातत्याने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज वृत्तमालिका प्रकाशित करीत आहे. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना यासंदर्भात अवगत करण्यात येत आहे. परंतु अद्यापही म्हणावी तशी कारवाई यासंदर्भात करण्यात आलेली नाही.सामाजिक कार्यकर्ते पुरस्कृत चंद्रकांत खरात यांनी यासंदर्भात महासंचालकांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, जिल्हा रुग्णालयात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार हा डॉ. नितीन तडस हे जिल्हा शल्यचिकित्सक असतानाच्या काळात झालेला आहे. डॉ. तडस यांनी आपल्या कामकाजात अनेक अनियमितता केल्या. तसेच त्यांनी कामकाजात मोठ्या प्रमाणात कसूर केला आहे. रोखवहीमध्ये त्यांनी दैनंदिन नोंदी केलेल्या नाहीत. तसेच खर्चाच्या नोंदी घेऊन त्याचा गोषवारा पडताळणी केली नाही. याच काळात रोखपालाने मोठ्या प्रमाणात कॅशबुकात खाडाखोड केलेली आहे. त्यातून मोठ्या प्रमाणात पैशांचा अपहार झाला आहे. याशिवाय डॉ. तडस यांच्या कार्यकाळात मॉड्युलर ओटी टेंडरिंग करण्यात आले होते. हे काम देताना व त्याचे संचालन करताना अनेक अनियमितता पाळल्या गेल्या आहेत. सोलापूरच्या कंत्राटदाराशी संगनमत करून काम पूर्ण झालेले नसताना देखील त्याला ८० टक्के रक्कम अदा करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणात मोठा भ्रष्टाचार झालेला असून, या भ्रष्टाचारातून त्यांनी तसेच त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी लाखो रुपयांचा चुना शासनाला लावला आहे. भ्रष्टाचाराच्या पैशातून या सर्वांनी मोठ्या प्रमाणात अवैध चल अचल संपत्ती जमा केल्या आहेत. डॉ. तडस यांच्या अखत्यारीत काम करणारे भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे व सहायक अधीक्षक आर. एस.लकडे, कुलकर्णी यांनी मॉडेल ऑपरेशन थिएटरच्या साहित्य खरेदीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. मोठ्या प्रमाणात उपकरणे व इतर सामग्रीची कागदोपत्री खरेदी दाखवण्यात आली. प्रत्यक्षात मात्र मॉड्युलर ओटीचे काम पूर्ण झालेच नाही आणि त्या ठिकाणी कोणतीही उपकरणे लावण्यात आलेली नाहीत. तसेच शासनाच्या विविध लेखा शिर्षकामधील व २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य या लेखा शिर्षकाखाली जे अनुदान प्राप्त झाले होते त्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. हा संपूर्ण भ्रष्टाचार यापूर्वी ज्या काही चौकशी समित्या स्थापन करण्यात आल्या, त्यांच्यासमोर उघड झालेला




आहे. या चौकशी समित्यांच्या अहवालातही डॉ. तडस यांच्यासह भांडारपाल प्रकाश बोथे, आर. एस. लाकडे आणि कुलकर्णी यांच्यावर ठपका ठेवण्यात आलेला आहे. परंतु हे सर्व भ्रष्ट अधिकारी इतके निर्लज्ज आणि इतके मुजार आहेत की ते भ्रष्टाचार करून चांगलेच कोडगे झालेले आहेत. त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे. या सर्व भ्रष्टाचाऱ्यांच्या अवैध संपत्ती जप्त करण्यात याव्यात, अशी मागणी खरात यांनी या निवेदनातून केली आहे.दैनिक जनसंचलनकडेही या भ्रष्टाचाराचे सज्जड पुरावे आहेत. त्यामुळे या भ्रष्टाचाऱ्यांवर तात्काळ कारवाी करणे आता क्रमप्राप्त झाले आहे. जोपर्यंत या भ्रष्टाचाऱ्यांच्या संपत्ती जप्त केल्या जात नाहीत, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या भ्रष्टाचाविरोधात आसूड ओढतच राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात..

# शुल्लक कारणांवरून मिलिंद नगरात तुफान हाणामारी!



जनसंचलन/बुलढाणा

येथील मिलिंद नगरातील बुद्ध विहारामध्ये शेळ्या बांधण्याच्या कारणामुळे एका युवकाला ५ ते ७ जणांनी मारहाण केल्याची आज घटना घडली आहे. या संदर्भात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल आहे. थोडक्यात हकीकत अशी की, काही दिवसापूर्वी निलेश मारुती बोरकर व तक्रारदार यांचा मुलगा योगेश भगवान गवई यांचे भांडण झाले आणि ते आपसात मिटले होते. परंतू आज बुद्ध विहारामध्ये शेळ्या का बांधतो म्हणून योगेश गवईने निलेश बोरकरला हटकले असता,वाद उफाळला. दरम्यान योगेश गवईला कोयत्याने हातावर वार करण्यात आला तसेच चापटा बुक्क्यांनी मारहाण करण्यात आली.या मारहाणी प्रकरणी निलेश मारुती बोरकर, मनीषा निलेश बोरकर, ओम निलेश बोरकर, कैलास मारुती बोरकर, द्वारकाबाई मारुती बोरकर, गणेश राजेश बोरकर, संतोष राजेश बोरकर यांच्या विरुद्ध पोलीस तक्रार करण्यात आली आहे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विशेष मोहिमेमध्ये २ लाख ९६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त...

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील अवैध दारु निर्मिती, हातभट्टी ठिकाण, तसेच अवैध मद्यविक्री केंद्रावर एकुण १४ ठिकाणी छापे घालून १४ गुन्हे नोंदविले असून १४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या गुन्हयात एकुण १ वाहन जप्त केले असून या गुन्ह्यात एकूण २,९६,०१५ रुपयांचा मुद्देमाल राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा विभागाने जप्त केलेला आहे. जिल्ह्यात नाताळ व नववर्ष आगमनाच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा कार्यालयाच्या वतीने अवैध मद्य निर्मिती, वाहतुक व विक्री वर प्रतिबंध घालण्यासाठी बुलढाणा कार्यालयाच्या वतीने अवैध मद्य निर्मिती, वाहतुक व विक्री वर प्रतिबंध घालण्यासाठी बुलढाणा जिल्हयातील कार्यक्षेत्रीय अधिकारी निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, देऊळगाव राजा व निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, खामगाव व निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक यांच्याकडून बुलढाणा जिल्हयातील विविध हातभटटी ठिकाण, तसेच अवैध मद्यविक्री केंद्रावर छापे टाकुन कारवाई केलेली आहे. मा. आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य मुंबई विजय सूर्यवंशी (भा.प्र.से.) साहेब. संचालक श्री. प्रसाद सुर्वे साहेब व विभागीय उप-आयुक्त अर्जुन ओहोळे साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाचे गुन्हाअन्वेषणाचे कामकाज सुरू आहे. तसेच डॉ.पराग नवलकर अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हयात दि. २१ डिसेंबर २०२४ व २२ डिसेंबर २०२४ रोजी मोहिम राबविण्यात आली आहे. सदर मोहिमेत बुलढाणा जिल्ह्यातील अवैध दारु निर्मीती, हातभटटी ठिकाण, तसेच अवैध मद्यविक्री केंद्रावर एकुण १४ ठिकाणी छापे घालुन १४ गुन्हे नोंदविले असुन १४ आरोपींना अटक केली असुन सदर गुन्हयात एकुण १ वाहन जप्त केले असुन सदर गुन्हयात एकुण रुपये २,९६,०१५ /- एवढा मुद्देमाल जप्त केलेले आहे. सदर कारवाई किशोर पाटील, निरीक्षक, बुलढाणा यांच्या अधिनस्त असलेले ए.जी.शिंदे दुय्यम निरीक्षक, बुलढाणा -१, आर.के. विठोरे दुय्यम निरीक्षक, बुलढाणा-२ व सतिश पाटील दुय्यम निरीक्षक, बुलढाणा-३ तसेच विकास पाटील निरीक्षक, खामगाव यांच्या अधिनस्त असलेले आर.एन. गावंडे दुय्यम निरीक्षक खामगाव -१ व ३. कुटेमाट दुय्यम निरीक्षक खामगाव-२ तसेच राहुल रोकडे निरीक्षक. देऊळगाव राजा यांच्या अधनस्त असलेले रोटे, दुय्यम निरीक्षक देऊळगाव राजा-१ नयना देखमुख, दुय्यम निरीक्षक देऊळगाव राजा-२ व ३ तसेच महेश बोज्जावारी निरीक्षक,



राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक बुलढाणा यांच्या अधिनस्त असलेले माकोडे दुय्यम निरीक्षक, भ.प. यांच्या सहभागाने व मार्गदर्शनाखाली जिल्हयातील सर्व दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, व त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांचया सहभागा आहे. अवैध मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स, धाब्यांबाबत अवैध मद्य निर्मीती, वाहतुकीबाबत माहिती देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून टोल फ्री नंबर १८००२३३९९९९ वर किंवा व्हॉटसॲप नंबर ८४२२००११३३ वर किंवा excisesuvidha.mahaonline.gov.in या विभागाचे पोर्टलवर तात्काळ कळवावे.

---

## सांताक्लॉज लाल रंगाचेच कपडे का परिधान करतो?

जनसंचलन/बुलढाणा

आज ख्रिसमस डे! जिंगल बेल, जिंगल बेलची मना मनात धून! गुलाबी थंडीचा आनंद द्विगुणीत करायला ख्रिसमस सण आज आलाय. सांताक्लोज लहान मुलांना गिफ्ट आणि मोठ्यांना शुभेच्छा देऊन जातो. पण, लहानपणापासून सांताक्लॉज लाल रंगाचेच कपडे का घालतो हे कोडे प्रत्येकाला पडलेले असते. सांताक्लॉज लालच रंगाचे कपडे परिधान का करीत असावा? तर वाचा.. लाल रंगातील उबदार सूट घातलेला पाठीवर भलीमोठी थैली घेतलेला, ज्याचे पोट मोठे आहे. ज्याचे लांब केस, दाढी पांढरी आहे. पाठीवर भेटवस्तूंची थैली घेऊन मुलांना भेटवस्तू द्यायला येणारा सांता आपण नेहमीच पाहत आलो आहोत. दरवर्षी येणारा ख्रिसमस वेगळी उर्जा देऊन जातो.दरवर्षी २५ डिसेंबर रोजी ख्रिसमस साजरा केला जातो. दरवर्षी प्रभु येशूच्या वाढदिवसानिमित्त सांताक्लॉज गिफ्ट आनंदाचे वाटप करतात. मुलांना भेटवस्तू देतात. प्रत्येकजण नवीन कपडे घालून हा दिवस साजरा करतो.एका मान्यतेनुसार, ख्रिसमसच्या दिवशी लाल रंगाच्या कपड्यांबाबत अनेक गोष्टी आहेत. असे म्हटले जाते की लाल रंग हा आनंद आणि प्रेम आणि उत्साहाचा रंग आहे. लाल रंग हा येशू ख्रिस्ताच्या रक्ताचेही प्रतीक मानला जातो. जे येशूद्वारे इतरांवरील अपार प्रेम दर्शवते. प्रभु येशूने प्रत्येक ख्रिश्चनांना आपले आपत्य मानले आहे आणि त्यांच्यावर खूप प्रेम केले. त्यांचा सांभाळ केला. यामुळेच लाल रंगातून सर्वांच्या मनात आपुलकीचा धडा निर्माण करायचा होता. लाल हा आनंदाचा रंग आहे, त्यामूळे जिथे लाल रंग असेल प्रेम असेल तिथे आनंद येतो.

## व्हॉलीबॉल अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेसाठी आज निवड चाचणी

जनसंचलन/ बुलढाणा

व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या द्वारा दि. ७ ते १३ जानेवारी २०२५ या कालावधीत जयपूर राजस्थान या ठिकाणी सन २०२५ मधील वरीष्ठ गटाच्या राष्ट्रीय अंजिक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या निवड चाचणी कार्यक्रमाकरीता वरिष्ठ गटाच्या व्हॉलीबॉल या खेळाच्या इच्छुक खेळाडुंनी (पुरुष /महिला) दि. २५ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा क्रीडा संकुल,जांभरून रोड, बुलढाणा येथे उपस्थित रहावे. राष्ट्रीय स्तरावर व्हॉलीबॉल या खेळप्रकारातील अधिकृत एकविध खेळ संघटना कार्यरत नसल्याने, भारतातील व्हॉलीबॉल खेळाच्या प्रसार व प्रचाराचे काम सुरळीत सुरु रहावे यासाठी इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनद्वारा ॲडहॉकसमितीची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रस्तावित राष्ट्रीय स्पर्धे साठी राज्य संघाची निवड दि. २६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता चंद्रशेखर आगाशे शारीरकि शिक्षण महाविद्यालय, गुलटेकडी पुणे ४११०३७ येथे करण्यात येणार आहे. त्यानुसार जिल्हयाचा संघ निवडकरण्याकरीता खालील प्रमाणे निवड चाचणीचा कार्यक्रम आयोजित केला राष्ट्रीय स्पर्धेसाठी, राज्य संघाची निवड चाचणी दरम्यान निवास व भोजनाची व्यवस्था खेळाडुंनी स्वत:करायची आहे. खेळाचा गणवेष, आधार कार्ड, पासपोर्ट साईज फोटो सोबत आणणे अनिवार्य आहे. उपस्थित खेळाडुमधुन उत्कृष्ठ पुरुष व महिला प्रत्येकी एक एक संघ पुणे



येथे होऊ घातलेल्या राष्ट्रीय स्पर्धा निवडचाचणी कार्यक्रमा करीता पाठविण्यात येईल. निवड चाचणी कार्यक्रम जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा व बुलढाणा जिल्हा व्हॉलीबॉल खेळ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत आहे. अधिक माहिती करीता क्रीडा अधिकारी आर. आर. धारपवार यांना ९९७०११८७९७ या क्रमांकावर संपर्क साधावा. उक्त निवड चाचणी करिता उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर बुलढाणा यांनी केले आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ई-पीक पाहणी नोंदणीसाठी १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

जनसंचलन/बुलढाणा

सर्व शेतकरी बांधवांना आवाहन करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाची (ई-पीक पाहणी) सुरुवात दि १ डिसेंबरपासून सुरू झालेला आहे. आपल्या सातबारावर पीक पेरा स्वता: शेतकऱ्यांनी ॲन्ड्राईड फोन द्वारे नोंदणी करायची आहे. शेतकरीस्तरावर पीक पाहणी करण्यासाठी अंतिम दि. १५ जानेवारी २०२५ पर्यंत आहे. रब्बी हंगामी २०२४ ई पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात आज रोजी पर्यंत ७५६५३५ हे. आर. क्षेत्रापैकी १०९०९६ हे. आहे क्षेत्रा-वर, तसेच एकूण ८३६०३३ पीक पाहणी करावयाच्या म प्लॉटपैकी १०५६४२ प्लॉटवर संबंधित शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची ईपीक पाहणी डीसीएस व्हर्जन ३.० या मोबाईल ॲपद्वारे आपल्या सातबारावर नोंदणी केलेली आहे. आजवर बुलढाणा जिल्ह्यात डिजटल क्रॉप सर्वे अंतर्गत ई-पीक पाहणीची नोंदणी १४.४२ टक्के क्षेत्रावर झोलेली आहे. उर्वरित क्षेत्रावर सर्व शेतकरी बांधावांना ई पी कपाहणी ॲपद्वारे पीकांची नोंदणी करण्याचे आ-वाहन करण्यात येत आहे. सदर पीक पाहणीची नोंदणी ई पीक पाहणी व्हर्जन ३.० या मोबाईल ॲपद्वारे करतांना ॲन्ड्रॉईड फोन आवश्यक आहे. सदर ॲप गूगल फोन अपडेट करून मोबाईलमध्ये इन्स्टॉल करून घ्यावे. ई पीक पाहणी ॲप द्वारे शेत बांधावर जावुन पीकांची नोंदणी करून माहिती अपलोड करावी. या कामी संबंधित शेतकऱ्याजवळ मोबाईल उपलब्ध नसल्यास, संबंधित गावाचे तलाठी, कोतवाल तसेच कॉमन सर्व्हिस सेंटर यांची मदत घेवून आपल्या पीकांची नोंदणी ई-पीक पाहणी ॲपद्वारे करून घेण्यात यावी. सदर ॲपविषयी काही अडचण असल्यास संबंधित गावाचे तलाठी तसेच कॉमन सर्व्हिस सेंटर, आपल्या गावातील डीसीएस करिता नियुक्त सहाय्यक यांची मदत घ्यावी. ई पीक पाहणी द्वारे पीकांची नोंदणी न केल्यास आपल्या सातबारा वर पीक पेरा कोरा राहील. जो नंतर भरता येत नाही त्यामूळे पीक विमा, व इतर शासकीय अनुदान व लाभर मिळविण्यास अडचण निर्माण होईल. अवेळी पाऊस किंवा इतर नैसर्गीक आपत्ती या बाबत पिक विमा मिळण्यासाठी सातबारा वर अचूक पीक नोंद असणे आवयक आहे. त्याअनुषंगाने सर्व शेतकरी बांधवांनी १५ जानेवारी २०२५ पुर्वी आपल्या पीकांची नोंदणी करून घेण्यात यावी, असे आवाहन प्र. जिल्हाधिकारी सदाशिव शेलारेयांच्यावतीने करण्यात आले आहे

# बुलढाणा येथे सहाकर से समृध्दी कार्यक्रम

जनसंचलन/बुलढाणा

केंद्र शासनाच्या सहकार मंत्रालयाकडून नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पेतून सहकार से समृध्दी कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे व्ही.सी. व्दारे दि. २५ डिसेंबर रोजी दुपारी १.३० वाजता दि बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बुलडाणा सभागृहामध्ये प्रक्षेपीत करणत येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आ-वाहन जिल्हा उपनिबंधक नानसाहेब चव्हाण यांनी केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सहाकर से समृध्दी अंतर्गत बहुउद्देशीय प्राथमिक सहाकरी संस्था, दूध व्यवसाय व मत्सपालन सहकारी संस्थंच्या स्थपनेव्दारे ग्रामपंचायत व गावांना समाविष्ट करण्याची योजना राबविण्यात येत आहे. या योजनेतंर्गत स्थापन झालेल्या १० हजार प्राथमिक सहाकरी संस्थापैकी ६ हजार संस्था दूध व्यवसायाशी निगडीत आहेत. महत्व-पूर्व उपलब्धी साजरी करण्यासाठी केंद्र शासनाच्या सहकार मंत्रालयाकडून २५ डिसेंबर रोजी न्यु दिल्ही येथे कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे व्हीसी व्दारे दुपारी १.३० वाजता दि बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सभागृहामध्ये प्रक्षेपीत केल्या जाणार आहे. या कार्यक्रमाध्ये बुलढाणा जिल्हयातील केंद्रीय योजनेतंर्गत उत्कृष्ठ काम करणाऱ्या सेवा सहाकरी संस्थाचे (जन औषधी केंद्र/सीएससी. सेंटर/गोदाम बांधकाम) असे विविध उपक्रम राबविलेल्या संस्थांच्या कामकाजाची माहिति फोटो व व्हिडीओव्दारे देण्यात येणार आहे. या कार्यक्रमास जिल्हा सहाकर समिती () जिल्हा सहकार समितीअंतर्गत संयुक्त कार्यकारी समिती () चे सदस्य प्राथमिक पत पुरवठा सहाकरी संस्था व मत्स सहकारी संस्थांचे पदाधिकारी संचालक मंडळ, संघाचे प्रतिनिधी, सचिव यांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी केले आहे.




## प्राथमिक आरोग्य केंद्राचे अग्नी शमन सिस्टमला पाण्याची टाकीच जोडलेली नाही, तर कुठे पंप सुद्धा नाही.

# लोणार ग्रामीण रुग्णालया प्रमाणे दुर्दैवी घटना घडल्यास जवाबदार कोण.



जनसंचलन/लोणार

आग, पाणी आणि वारा यांचे कधी कोणते रूप पहायला मिळेल सांगता येत नाही त्याला पाहता इमारत बनवलेली असते ज्यात भिंती व छप्पर मुळे पाऊस आणि वाऱ्या पासून संरक्षण मिळते मात्र आगी पाऊण स्वरक्षण साठी अग्नी शमन यंत्र, अग्नी शमन सिस्टम, फायर अलर्ट बसवण्यात आलेले असतात ज्याने सार्वजनिक ठिकाणी आगी पासून बचाव होऊ शकेल त्याला पाहता नवीन इमारतीचे काम होताच त्याला मध्ये अग्नी शमन सिस्टम काम करते का याची पाहणी केली जाते नंतर त्याला इमारतीच्या पूर्णतःवाची शिक्का मार्तब होते मात्र जिल्हातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अग्नी शमन सिस्टम साठी लागणाऱ्या पाण्याच्या टाक्याच बसवण्यात आलेल्या नाही ज्याने प्राथमिक आरोग्य केंद्रातली अग्नी सुरक्षा वाऱ्यावर आहे.

जिल्हात ५२ प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम २०१८ ते २०२१ मध्ये पूर्ण झाले बहुतांश प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्या जातात ज्यांचे कॅम्प सध्या मोठ्या प्रमाणात सुरु आहेत तर लसीकरण, प्रसूती, नियमित ओ पी डी मध्ये रुग्ण तपासणी त्या साठी रुग्णाला भर्ती करण्यात येते मात्र येथील इमारती मध्ये अग्नी सुरक्षा यंत्रणा कितपत योग्य आहे याची पाहणी केली असता असे दिसून आले की संबंधित ठेकेदाराने प्राथमिक आरोग्य केंद्रात अग्नी शमन साठी यंत्रणा बसवली ज्यात धूपट दिसताच सायरन वाजतो मात्र आग विझवन्या साठी पाणी लागते पण त्याला पाण्या साठी पाण्याची टाकीच बसवण्यात आलेली नाही ज्याने आग कशी विझणार हा प्रश्न निर्माण झालेला आहे ही परिस्थिती फक्त डोणगाव येथीलच प्राथमिक आरोग्य केंद्राची नसून संपूर्ण जिल्हात असल्याची माहिती सूत्रांनी दिली जर लोणार ग्रामीण रुग्णालय सारखी घटना प्राथमिक आरोग्य केंद्रात घडली तर त्याला कोण जवाबदार राहणार असा प्रश्न निर्माण होत आहे तर दुसरीकडे प्राथमिक आरोग्य केंद्रात असणारे अग्नी शमन बंब निकामी आहेत का त्याची एक्सपायरी किती असे कित्येक बाबी तपासून पाहणे व त्याची माहिती कर्मचाऱ्यांना देणे गरजेची आहे पण ती दिल्या गे-लेली नसल्याचे पाहायला मिळते. प्राथमिक आरोग्य केंद्रात असलेल्या अग्नी शमन यंत्रणा मध्ये आग विझवन्या साठी पाण्याची टाकी नसल्याने दुर्दैवी घटना घडली तर त्याला कोण जवाबदार राहणार आहे त्या सोबतच अग्नी शमन यंत्र, फायर बॉल या सारख्या जीवन रक्षक प्रणा-लीची प्रशिक्षण वेळोवेळी दिल्या जायला पाहिजे त्याचे पोलीस विभागा प्रमाणे मॉक ड्रिल व्हायला हवी मात्र तसे होताना दिसत नाही ज्याने दुर्दैवी घटना घडत राहतात ज्यात संबंधित कर्मचारी स्वतःहाचे जीव वाचवेल की इतरांचे प्राण अशी स्थिती सध्या जिल्हातील आरोग्य यंत्रेनेची आहे.

(जिल्हातील प्राथमिक आरोग्य केंद्रात मी चार्ज घेण्या अगोदर फायर सिस्टम बसवलेले आहेत मात्र आग विझवण्या साठी ला-गणारे पाणी साठी टाकी खरेदीची प्रक्रिया सुरु असून लवकरच त्याचे काम मार्गी लागेल - डॉ अमोल गिते जिल्हा आरोग्य अधिकारी )

# मोताळ्यात मोर्चा धडकला परभणी प्रकरणाचे पडसाद!

# जयश्री शेळकेंनी व्यक्त केल्या तीव्र भावना!

**जनसंचलन/मोताळा**



परभणी येथील पोलिसांच्या अमानुष मारहाणीत भिमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला, बीड मधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या दोन्ही घटनेतील मुख्य आरोपींना आणि सूत्रधाराला कठोरात कठोर शिक्षा व्हावी तसेच गृहमंत्री अमित शाह यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याच्या निषेधार्थ शिव फुले शाहू आंबेडकर अनुयायांच्या वतीने आज मोताळा तहसील कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते! जयश्रीताई शेळके यांनी सहभागी होऊन तीव्र भावना व्यक्त केल्या.या मोर्चाला प्रचंड संख्येने महिला व पुरुष बांधवांनी उपस्थित राहत निषेध व्यक्त केला. यावेळी मोताळा तहसीलदार हेमंत पाटील यांना निवेदन देण्यात आले.सदर निवेदनावर डि.टी. इंगळे,अरुणभाऊ डोंगरे, लक्ष्मणराव गवई,भीमराव शिरसाठ,निळकंठ वानखेडे,साहेबराव डोंगरे,अनिल खराटे,ॲड.सतीषचंद्र रोठे,संतोष मेढे,कैलास खराटे,संदीप मोरे,संदीप वानखेडे,विनोद धुरंधर,विनोद सावळे,अजय खराटे,जितेंद्र खराटे,बाळासाहेब अहिरे,शेख साबु एसपी अहिरे,विजय सुरडकर सँडी मेढे,राजु वाघ इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# संत चोखामेळा यांच्या जन्मोत्सवाचे सामाजिक न्याय मंत्री ना.संजय शिरसाट यांना निमंत्रण!

# संत चोखामेळा यांच्या नावाने सुरू झालेल्या पुरस्काराची घोषणा त्वरित करा!

**जनसंचलन/बुलढाणा**

आपल्या अभंगवाणीतून प्रबोधन करणारे विठ्ठलाचे निस्सीम भक्त संत चोखामेळा यांचे मेहुणा राजा हे जन्मस्थळ वर्षानुवर्ष उपेक्षितच आहे जिल्हा प्रशासनाच्या वतीने दरवर्षी १४ जानेवारीला चोखामेळा जन्मोत्सव साजरा केल्या जात आहे मात्र जन्मोत्सव सक्तीचे भक्त आणूनच दरवर्षी हा उत्सव साजरा केल्या जातो अलीकडच्या काही वर्षात जन्मस्थळ विकासाच्या हालचाली सुरू झाल्या कित्तेक वर्ष झाडाखाली चोखामेळा यांची मूर्ती उघड्यावरच होती वारंवार मागणीनंतर मंदिर निर्माण करून डोक्यावर छत्र उभारल महायुती सरकार असतांना तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री यांनी संत चोखामेळा यांच्या नावाने शासनाकडून राज्यस्तरीय पुरस्कार देण्याची परंपरा त्यांच्या जन्मभूमीतूनच मी सुरू केली मात्र मागील काही वर्षापासून सामाजिक न्याय विभागाला या पुरस्काराचा विसर पडला सामाजिक न्याय विभागाला संत चोखामेळा पुरस्काराची घोषणा केली नाही त्यामुळे या पुरस्काराची घोषणा त्वरित करावी व संत चोखामेळा यांच्या जन्मस्थळाच्या विकासाला गती देण्यासाठी माझ्या कार्यकाळात शासनाने जो निधी मंजूर केला आहे या साठी मंत्रालय स्तरावर बैठकीचे आयोजन करून १४ जानेवारी रोजी होणाऱ्या जन्मोत्सवाचे निमंत्रण मतदार संघाचे माजी आमदार डॉक्टर शशिकांत खेडेकर यांनी सामाजिक न्याय मंत्री ना संजय शिरसाट यांची छत्रपती संभाजी नगर येथे भेट घेऊन निमंत्रण दिलं आहे. यावेळी शिवसेनेचे नेते सुदाम काकड,दीपक पवार आदी मंडळी उपस्थित होते संत चोखामेळा यांचा जन्मोत्सव लोकोत्सव व्हावा या बद्दल पुढाकार घेतल्या जात आहे मात्र प्रशासकीय उदासीनता आणि चोखामेळा यांच्याबद्दल नसलेली माहिती ही नागरिकांमधील उदासीनतेमुळे जन्मोत्सवाला विशाल असे स्वरूप आलेले दिसत नाही महाराष्ट्र ही संतांची भूमी असून याच भूमीत अनेक संत होऊन गेले आहे बाराव्या शतकात विठुरायाचे भक्त संत चोखामेळा यांचा जन्म १४ जानेवारी बाराशे ६८ देऊळगाव राजा तालुक्यात मेहुणा राजा येथे झाला महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण जगाला थोर संताची चांगली शिकवण दिली त्या चोखामेळा यांचेही नाव आदराने घेतले जात त्यांचे जन्मस्थळ आजही उपेक्षित आहे या जन्मस्थळाचा विकास व्हावा याकरिता मागील काही वर्षापासून या विभागाचे तत्कालीन आमदार डॉक्टर शशिकांत खेडेकर यांनी प्रयत्न केले संत



चोखामेळा यांच्या बद्दल ची माहिती सर्वांना व्हावी यासाठी राज्य शासनाच्या वतीने सामाजिक न्याय विभागाअंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कार सुरू करण्यासाठी माजी आ डॉ शशिकांत खेडेकर यांनी शर्तीचे प्रयत्न केले त्यानुसार दोन वर्षी संत चोखामेळा यांच्या नावानं राज्यस्तरीय पुरस्काराची घोषणा झाली आणि तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांच्या उपस्थितीत पुरस्कार ची घोषणा केली पहिला पुरस्कार राष्ट्रीय प्रबोधनकार सप्तखंजेरीवादक सत्यपाल महाराज यांना सन २०१८ देऊन गौरविण्यात आले दुसरा पुरस्कार सप्तखंजेरीवादक तुषार सूर्यवंशी यांना प्रदान करण्यात आला मात्र नंतर चोखामेळा यांच्या नावाने पुरस्कार हा अद्यापही दिला नाही त्यामुळे चोखा भक्तांमध्ये नाराजीचा सुरू उमटतं आहे त्यामुळे आपल्या माध्यमातून या पुरस्काराची पुन्हा सुरवात करावी अशी मागणी यावेळी माजी आमदार डॉक्टर शशिकांत खेडेकर यांनी केली.

# कपाळावर अवतरला ॐ चा टिळा अन् चर्चेत आला धनंजयचा साखरपुडा!

**जनसंचलन/बुलढाणा**

समाजात काही अजब गजब गोष्टी घडतात.रायपूर येथील धनंजय जयस्वाल यांचा संभाजीनगर जवळील चौका गावात साखरपुडा सोहळ्या दरम्यानही अशी चमत्कारिक घटना समोर आली. धनंजय यांच्या कपाळावर टिळक व तांदळाच्या अक्षद लावल्यावर अचानक ओमची प्रतिकृती अवतरल्याने क्षणातच पाहुणे आश्चर्यचकित झाले आणि चर्चेला तोंड फुटले! परंतू हॅलो बुलढाणा याचे समर्थन करते असे नाही,हे महत्वाचे! सध्या लग्नसराईचे दिवस आहेत. पत्रिका जुळल्या आणि नवरा-नवरींची एकमेकांची पसंती झाली की वधू-वरांच्या कुटुंबीयाकडील लोक लग्न पक्के करण्यासाठी साखरपुडा हा विधी करतात. पूर्वी या विधीला कुंकू लावणे म्हणत. बुलढाणा जिल्ह्यातील रायपूर येथील धनंजय अनिल जयस्वाल या युवकाचा साखरपुड्याचा कार्यक्रम डिसेंबर रोजी संभाजीनगर जवळील चौका या गावातील मयुरी रामलाल जयस्वाल नावाच्या मुलीशी ठरला होता. या कार्यक्रमात धनंजय यांना कपाळावर टिळा व तांदळाच्या अक्षदा लावल्यानंतर अचानकपणे ओम या शक्तिशाली आणि प्रभावी प्रतिकृती दिसायला लागली.त्यामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसून चर्चेला उधाण आले होते.मान्यतेनुसार, ओम नमः शिवाय या मंत्राचा जप केल्याने महादेवाची विशेष कृपा होते आणि सर्व समस्या दूर होऊ शकतात व मनोकामना देखील पूर्ण होतात असे शिवपूराणात म्हटले आहे. तसेच कपाळावर तीळ लावल्याने शांती आणि ऊर्जा मिळते असे म्हटले जाते. त्यामुळे चंदन,अष्टगंध सिंदूर भस्म गुलाब असे अनेक प्रकारचे टिळक लावले जाते. टिळक लाला ने व्यक्तिमत्त्वात सात्विकता दिसून येते तसेच टिळा लावण्याचे अनेक मानसिक परिणाम देखील असल्याचे जाणकार सांगतात.असे असले तरी



सध्या मात्र धनंजय जयस्वाल यांच्या साखरपुड्यातील ओमची टिळ्यातून अवतरलेली प्रतिकृती चर्चेचा विषय ठरली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958